# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.
दुरध्वनी क्र. 28192828/28193087.

जा.क्र.मनपा/आस्था/ ५१३ /2025-26 दि. 05 / 05 /2025

विषय :- दि.28 एप्रिल, 2025 ते दि.12 मे, 2025 या कालावधीत सेवा पंधरवडा राबविण्याबाबत.

संदर्भ :- शासन परिपत्रक क्र. GAD/94/2024-GAD-Lokshahi Din, दि.23 एप्रिल 2025.

**आदेश**

सर्वसामान्य जनतेची कामे विहित कालावधीत व्हावीत याकरीता राज्य शासनाने सन 2015 मध्ये "आपले सरकार सेवा पोर्टल" सुरु केले आहे. त्या माध्यमातून जनतेची कामे विहित कालमर्यादेत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

त्या अनुषंगाने, दिनांक 28 एप्रिल, 2025 ते दिनांक 12 मे, 2025 या कालावधीत सेवा पंधरवडा राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या सेवा पंधरवडा कालावधीत दि.25 एप्रिल, 2025 रोजी प्रलंबित असलेल्या सर्व अर्जाचा निपटारा करणेसाठी मोहीम घेणेबाबत संदर्भीय शासन परिपत्रकान्वये कळविले आहे. त्याअनुषंगाने खालील कामकाजाची अंमलबजावणी करून कामाचा निपटारा करणेकरीता खालील प्रमाणे विभागांना आदेशित करण्यात येत आहे.

| विषय | अंमलबजावणी विभाग |
|---|---|
| 1. आपले सरकार सेवा पोर्टल प्राप्त होणाऱ्या सर्व तक्रारींचा निपटारा करणे | सर्व विभाग |
| 2. नागरी सेवा केंद्राचे कामकाज करणे | सहायक आयुक्त प्रभाग क्र. १ ते ६, निबंधक व उप निबंधक, जन्म मृत्यू व विवाह नोंदणी |
| 3. सार्वजनिक तक्रार पोर्टल (पब्लिक ग्रेव्हियन्स पोर्टल). | सर्व विभाग |
| 4. विभागाच्या स्वतःच्या संकेतस्थळावरील प्रलंबित अर्ज. | सर्व विभाग |

तसेच संदर्भीय परिपत्रकान्वये सेवा पंधरवडामध्ये खालील नमूद केलेल्या तक्त्यांमधील सेवांचा अंतर्भाव केलेला आहे. त्याअनुषंगाने खालील प्रमाणे विभागांना आदेशित करण्यात येत आहे.

| अ.क्र | सेवा | अंमलबजावणी करणारे विभाग व अधिकारी |
|---|---|---|
| १. | मालमत्ता हस्तांतरण नोंद घेणे | सहायक आयुक्त प्रभाग क्र. १ ते ६<br>सहायक आयुक्त मालमत्ता कर विभाग |
| २. | नव्याने नळ जोडणी देणे | कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग |

| | | |
|---|---|---|
| ३. | मालमत्ता कराची आकारणी करणे व मागणी पत्र देणे | सहायक आयुक्त प्रभाग क्र. १ ते ६<br>सहायक आयुक्त मुख्य कार्यालय |
| ४. | दिव्यांग प्रमाणपत्र देणे | समाज विकास अधिकारी, समाज विकास विभाग |
| ५. | विवाह नोंदणी प्रमाणपत्र देणे | उप निबंधक, वैद्यकीय विभाग |
| ६. | जन्म मृत्यु नोंद घेणे व प्रमाणपत्र देणे | सहायक आयुक्त प्रभाग क्र. १ ते ६, उप निबंधक, जन्म मृत्यु विभाग |
| ७. | रोजगार मेळावा आयोजित करणे | समाज विकास अधिकारी, समाज विकास विभाग |
| ८. | महिलांचे बचत गट स्थापन करणे,शाशन पोर्टलवर नोंदणी करणे व शासनामार्फत फिरता निधी उपलब्द करून देणे | समाज विकास अधिकारी, समाज विकास विभाग |
| ९. | महिला बचत गटास प्राधान्याने रोजगार उपलब्द करून देणे | समाज विकास अधिकारी, समाज विकास विभाग |
| १०. | लसीकरण करणे | मुख्य वैद्यकीय अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग |
| ११. | प्रशिक्षित उमेदवारांना रोजगार उपलब्ध करून देणे | समाज विकास अधिकारी, समाज विकास विभाग |

सबब, सोबत जोडलेल्या प्रपत्रामध्ये सेवा पंधरवडा मध्ये वरीलप्रमाणे कामकाजाचा निपटारा संबंधीत विभागाने करावयाचे असून, केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दि.13/05/2025 रोजी आस्थापना विभागात सादर करण्यात यावा.

(कल्पिता पिंपळे)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

(मा.आयुक्त महोदय यांचे मान्यतेने)